# प्रेस नोट

## '' कायदा व सुव्यवस्था तसेच नक्षल घडामोडी संबधाने आढावा बैठक''

भंडारा:— जिल्हयात दिनांक १०/१२/२०१७ रोजी पोलीस मुख्यालय भंडारा येथे मिटींग हॉल मध्ये भंडारा व गोंदीया जिल्हयातील गृह विभागा संबधी कायदा व सुव्यवस्था तसेच नक्षल घडामोडी संबधाने आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर बैठकीत मा. ना. श्री. दिपक केसरकर, राज्यमंत्री गृह (ग्रामीण) वित्त व नियोजन तथा पालकमंत्री सिंधुदुर्ग यांचे उपस्थिती दरम्याण नक्षल घडामोडी संबधाने आढावा बैठक घेण्यात आली, आढावा बैठकी दरम्यान, पोलीस अधीक्षक श्रीमती विनिता एस. मॅडम यांनी भंडारा जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था संबधात महत्वाच्या घटना, जसे बाल लैंगिक अत्याचार, महिंलावर होणारे अत्याचार, महिलांवरील कौटुंबीक अत्याचार अल्पवयीन मुले— मुलांना पळवुन नेणे, घरफोडया, दरोडा, चोऱ्या इंत्यादी बाबत गुन्हे तसेच भंडारा जिल्हयातील नक्षल ग्रस्त असलेले भाग, साकोली, लाखनी, लाखांदुर, दिघोरी पो. स्टे. अंर्तगत येत असलेल्या नक्षलग्रस्त बाबत, तसेच परीसरातील आदिवासी यांचे करीता राबविण्यात आलेल्या विविध योजना बाबत माहीती अवगत केली. तसेच जिल्हयातील नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या विविध योजना बाबत, उदा. फिरते पोलीस स्टेशन, जनजागृती रथयात्रा, दामीनी पथक, पोलीस मित्रा सोबत रात्रगस्त पेट्रोलींग, प्रतिसाद ॲप्स, सिटीजन पोर्टल ॲप्स, सायकल पेट्रोलींग, सेल्फी विथ पोलीस इत्यादी योजने बाबत माहीती अवगत केली.

भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशन अंर्तगत निवासस्थाने, ऑफीस, बिल्डींग, बांधकामा बाबत शासनास पाठवीण्यात आलेल्या, प्रस्थावा बाबत माहीती दिली. दरम्याण मा. श्री सुहास दिवसे जिल्हाधीकारी भंडारा यांनी सुध्दा जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था बाबत माहीती व विकास कामा बाबत माहीती अवगत केली.

तदनंतर पोलीस अधीक्षक गोंदीया श्री. भुजबळ यांनी गोंदिया जिल्यातील कायदा व सुव्यवस्था, महत्वाच्या घटना ,नक्षल विरोधी ऑपरेशन , आदीवासी यांचे विकासाच्या दृष्टीने विविध योजना राबविण्या बाबत अवगत केले.

मा. श्री. ठाकरे जिल्हाधीकारी गोंदिया यांनी सुध्दा जिल्हयाचे विकास कामा बाबत नक्षल ग्रस्त भागातील लोकांच्या समस्यावर उपाय योजना करण्यात आलेली माहीती मा. मंत्री महोदयांना अवगत केली.

आढावा बैठकी दरम्यान गडचीरोली नक्षल विरोधी अभियानाचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक मा. श्री. अंकुश शिंदे यांनी सुध्दा नक्षलवादंयाच्या हालचाली व करण्यात येणा—या उपाय योजना बाबत तसेच आदिवासी भागातील युवकांच्या विविध समस्या व सामान्य नागरीकांच्या हत्या झालेल्या पिडीत कुंटुबीयांच्या नातेवाईकांचे पुर्नवर्सन, नौकरी याबाबत माहीती अवगत केली.

सदर बैठकीत उपस्थित मान्यवर मा. ना. श्री. दिपक केसरकर, राज्यमंत्री गृह (ग्रामीण) वित्त व नियोजन तथा पालकमंत्री सिंधुदुर्ग श्री. सुहास दिवसे, जिल्हाधीकारी भंडारा, श्री. ठाकरे जिल्हाधीकारी गोंदीया, श्रीमती विनिता साहू पोलीस अधीक्षक भंडारा, रश्मि नांदेडकर अप्पर पोलसी अधीक्षक भंडारा, डॉ. सुजाता गंदे मॅडम, उपवीभागीय पोलीस अधीकारी भंडारा श्री, जोगदंड, उपवीभागीय पोलीस अधीकारी साकोली श्री, डिसले, उपवीभागीय पोलीस अधीकारी तुमसर श्री, साळी उपवीभागीय पोलीस अधीकारी पवनी श्री, टिकस ,पोलीस उपअधीक्षक गृह भंडारा श्री कुलकर्णी, पोलीस निरीक्षक घुसर पो.नी. स्थागुशा भंडारा, पोलीस निरीक्षक

सिडाम, सपोनी. हत्तीमारे जिवीशा. भंडारा तसेच गोंदिया जिल्यातील वरीष्ठ अधीकारी सदर बैठकीत उपस्थीत होते.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.